# दलित आणि मानव अधिकार

**प्रशांत घोडवाडीकर**
सामाजिकशास्त्रे,संकुल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड

**प्रस्तावना :**

जगात सर्व प्रथम मानवाधिकारी मुळ जोपासण्यासाठी कांही प्रमाणात सुरवात झाली त्यात प्रामुख्याने या घटनांचा उल्लेख करावाच लागेल ते म्हणजे, १३ व्या शतकातील मॅग्नाकार्टा, १६८९ चे बिल ऑफ राईटस, १७७६ ची अमेरीकेतील क्रांती, १७८९ चा फ्रांसचा उठाव, या घटना घडल्या तेंव्हा प्रामुख्याने त्यात मानवी मुल्यांचा विचार प्रामूख्याने समोर आला. त्यात १८३३ मध्ये ब्रिटीश संसदेने एक प्रस्ताव सादर करण्यात आला व त्या प्रस्तावानूसार दास प्रथा समाप्त करण्यात आली. त्यानंतर जागतिक स्थरावर पहिल्या महायुध्दाच्या समाप्त नंतर राष्ट्रसंघ ही संकल्पना आमलात आली. त्यात महिलांचे अनैतीक व्यापार बंदी, विवाह वय वाढवणे बालकल्याण, शरणार्थींचे पुनर्वसन, मजुरदारांचा प्रश्न या बाबत राष्ट्रसंघाने महत्वाची भूमीका निभावली, त्यानंतर दुसऱ्या महायुध्दाच्या नंतर १९४६ मध्ये श्रीमती एलीनर रुजवेक्ट यांच्या अध्यक्षतेखाली मानवाधिकार आयोगाची स्थापना करण्यात आली. सप्टेंबर १९४८ ला आयोगाने संयुक्त राष्ट्राला मानवाधिकाराचे घोषणापत्र सादर केले. व त्यानंतर मानवाधिकार कायदे विकसति होत गेले. तरी भारताने यात हळूहळू सहभाग नोदविण्यास सुरवात केली. भारताने संविधानात ज्या तरतूदी नोंद करण्यात आलेल्या आहेत कालांतराने मानव आयेगात सूध्दा त्याचा विचार झालेला आहे त्यात महिलांच्या समस्या विषयक ठराव १९७९ ला सयुंक्त राष्ट्रसंध्यांच्या सर्वसाधारण सभेत मांडण्यात आला होता तर सविधानात यांची तरतूद होती व महिला संबंधीत समस्या निवारणा करीता डॉ. बाबासाहेबांनी संसंदेत हिंदू कोडबिल या ठरावाच्या कितीतरी आगोदर सादर केला होता पण डॉ. बाबासाहेब यांच्या हयातीत हे विध्येयक स्किारण्यात आले नाही पण १९६१ पासून सयुक्त राष्ट्रामूळे ते भारताने स्किारले आज हिंदू कोडबिलाचे एक एक कलम स्विकारले जात आहे

**मानवाधिकर म्हणजे**

मानवाला जन्मापासून मिळालेले हक्क म्हणजेच मानवी हक्क अशी सर्वसाधारण समज आहे. प्रत्येक व्यक्तीला वंश वर्ण लिंग, भाषा, धर्म, राजकीय, किंवा इतर विचारसरणी, राष्ट्रीय अथवा सामाजिक उत्पत्तीस्थान, मालमत्ता जन्म किंवा इतर कोणत्याही दर्जांच्या आधारावर भेदभाव न करता त्याच्या अथवा तिच्या हक्कांचा उपभोग घेण्याचा अधिकार आहे.

मानवी हक्क कायदयाद्वारे मानवी हक्कांची सनदशीर, कायदेशीर मार्गाने हमी दिली गेली आहे. यामुळे मानवी सन्मान ( मानव असल्याचा सन्मान - क्पहदपजल) आणि मुलभूत स्वातॅंय यामध्ये हस्तक्षेप करणाऱ्या कृत्यापासून/कृतीपासून व्यक्तीचे आणि समूहाचे संरक्षण होते. आंतरराष्ट्रीय पातळीवरील पारंपरिक कायदे, करार, कलमे कायदयांची मुलतत्वे आणि इतर कायदयांच्या स्त्रोतांमध्ये मानवी हक्क अभिव्यक्त/व्यक्त केले आहेत. मानवी हक्क कायदयाने राष्ट्रांना विशिष्ट पध्दतीने वर्तन करण्यास बंधन घातले असून काही विशिष्ट पध्दतीने वर्तन करण्यास बंधन घातले असून काही विशिष्ट उपक्रम (मानवी हक्कांचे उल्लघंन करणारे ) राबविण्यास प्रतिबंध केला आहे.

असे असुनही प्रत्येक व्यक्तीस मानव म्हणून जन्मापासूनच हक्क मिळालेले असल्याने हा कायदा मानवी हक्कांची (नव्याने) प्रस्थापना करीत नाही. व्यक्ती आणि समाजगटांच्या मानवी हक्कांचे अधिकारांच्या उपभोगात

हस्तक्षेप करणाऱ्या कोणत्याही कृत्यापासून अथवा सरकारद्वारे दुर्लक्षित कृत्यापासून करार व कायदयाचे इतर स्त्रोत औपचारिक संरक्षण करतात.

**भारतीय संविधानातील तरतुदी**

भारतीय संविधानानूसार देण्यात आलेल्या मुलभूत अधिकारात

**कलम १४** :राज्य कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायदयापुढे समानता अथवा कायदयाचे संरक्षण नाकारणार नाही.

**कलम १५** : धर्म, वंश, जात, लिंग, किंवा जन्मस्थान या कारणांवरून भेदभाव करण्यास मनाई

**कलम १६** : राज्याच्या नियंत्रणाखालील पदावरील सेवायोजना किंवा नियुक्ती यासंबंधीच्या बाबींमध्ये सर्व नागरिकांस समानसंधी असेल. धर्म, वंश, जात, लिंग, कुळ, जन्मस्थान, निवास या कारणावरून सेवायोजना किंवा पद अपात्र असणार नाही.

**कलम १७** : अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे व तिचे कोणत्याही स्वरूपातील आचरण निषिध्द करण्यात आले आहे. अस्पृश्यतेतून उद्भवणारी कोणतीही निःसमर्थता लादणे हा कायदयानुसार शिक्षापात्र अपराध असेल.

**मानवी हक्कांची वैशिष्टये**

- प्रत्येक व्यक्तिच्या योग्यतेचा व प्रतिष्ठेचा ;क्पहदपजलद्ध आदर करणे.
- वैश्विकता समानतेने आणि कोणताही भेदभाव न करता ते ; मानवी हक्क द्ध सर्वांना लागू आहेत.
- मानवी हक्क अविभाज्य आणि हिरावता न येण्याजोगे (प्दंसपमदंइसम) आहेत. विशिष्ट परिस्थिती वगळता ते हिरावून घेता येत नाहीत. मात्र न्यायालयाने व्यक्तीला गुन्हाखाली दोषी ठरवल्यास स्वातँयाचा हक्क संकुचित करता येतो.
- मानवी हक्कांचा एकमेकांशी संबंध असून ते परस्परावलंबी आहेत. त्यामुळे एखादया अधिकाराचे उल्लघंन केल्यास त्याचा परिणाम इतर अनेक अधिकारांच्या उपभोगावर होतो.
- कोणत्याही व्यक्तीस जगण्याचा स्वातँयाचा व सुरक्षेचा मुलभूत हक्क आहे.
- पुरेशा जीवनमानासह जगण्याचा हक्क
- मत व अभिव्यक्ती स्वातँयाचा हक्क
- शिक्षणाचा विचार, स्वातँयाचा आणि सद्सद्विवेक जपण्याचा हक्क व धर्मस्वातँयाचा हक्क आणि
- कोणत्याही प्रकारचा छळ आणि अवमानकारक वागणूकीपासून संरक्षण

भारतीय समाजातील प्रत्येक व्यक्तीला हे सर्व कायदे एक समान लागू आहेत भारतात कायदयांसमोर सर्व समान आहेत पण जातीव्यवस्थेवर समान नाहीत. यामुळे समाजातील विषमता वाढीस लागली भारतीय समाजात दलितांना पाहताना, गरीबी, भुमीहीन, शोषित श्रेणी, ठराविकजाती, अस्पृश्यता व उच्यनिचतेच्या भावनेतूनच पाहिले जाते.

**दलित म्हणजे कोण ?**

मराठी शब्द कोषानुसार **दलित** : चिरडलेले , चेपलेले, तुडवलेले, दाबलेले, चुरडलेले दळलेले, भरडलेले, अनुसूचित जातीतील, अस्पृश्य, मागास वर्गातील, उपेक्षित पीडित वंचित, (मो.वि. भाटवडेकर) असा सांगीतलेला आहे.दलित या शब्दाबद्दल सांगताना डॉ. गंगाधर पानतावणे सांगतात दलित ही जात नसून परिवर्तनाचे प्रतिक आहे.

पण आज समाजात दलित म्हणजे केवळ महार, मांग, कधी चांभार यांच्या पुरताच हा शब्द मर्यादीत झालेला आहे. या मागचे कारण या जातीच्या लोकांनीच याचा वापर मोठया प्रमाणात केला आहे. तर त्याच्यासाठीच हा शब्द वापरण्यात येत आहे. घटनेत या शब्दाला कुठलीच मान्यता नसताना, राजकिय नेते, शासन व सर्वच स्तरात याचा मोठया प्रमाणात वापर करण्यात येतो. शासनानेतर यापुढे जाऊन दलित मित्र पुरस्कार देण्याची प्रथा सुरू केली आहे. जेंव्हा केंव्हा एखादी घटना घडण्यास जसे आरक्षणास विरोध, संविधान बचाव, अशा घटना देशात घडतात तेंव्हा अनुसुचित जातीमधील दोनचार जातीच विरोध करण्यास पुढे येतात, अनुसुचित जातीमध्ये एकूण ५९ जाती आहेत तर अनुसुचित जमाती मध्ये ४८ जाती आहेत. यांचा उल्लेख कूठे होत नसला तरी या जाती गुपचूप आरक्षणाचा पुरेपुर फायदा घेतात हे मात्र वास्तव नाकारता येत नाही हेच लोक आदोलनात पुढे असल्यामूळे पोलीस केसेस सुध्दा

याच तरुणावर नोंदविण्यात येतात व हेच लोक संर्वाच्या नजरेत वाईट ठरत असतात.

**मराठवाडयातील दलित**

मराठवाडयात आजही जातीय भेदभाव व जातीय आत्याचाराच्या घटना घडतात. समाजात अस्पृश्यता कमी प्रमाणात असलीतरी जातीय भावना कायम आहे. ग्रामीण भागात याचा अनुभव प्रत्यक्ष दिसतो तर शहरात याची तिव्रता स्पष्ट दिसत नाही कारण अनुजातीच्या लोकांचा संबंध खुंल्याप्रवर्गातील लोकांसोबत सरळ येत नाही, त्यामूळे आजही मराठवाडयातील दलितांची सामाजिक स्थिती बिकट आहे. आजही दलितांकडे चांगले उत्पादन देणाऱ्या शेतजमीनी नाहीत जर असल्यास त्यांचे प्रमाण २ ते ५ एक्करच्या आतच आहेत ग्रामीन भागातील सर्वच लोकांचे जिवनमान शेतीवरच अवलंबुन आहे. दलित शेतमजुरीसाठी खुल्या वर्गांच्या लोकांच्या शेतातच काम करण्यासाठी जातात शेत मजुरी हेच त्यांचे महत्वाचे उत्पादनाचे साधन आहे. हे रोजगार हंगामी स्वरूपाचे आहे. त्यानुसारच त्यांना रोजगार उपलब्ध होतो. हंगामात दलितांची संपुर्ण कुटूंबे या ठिकाणी शेतात काम करण्यासाठी जातात यातून येणाऱ्या उत्पादनातूनच त्यांचे जिवनमान चालू आहे. *(संशोधनासाठी निवडलेल्या गावातून)* अजूनही आरक्षित जातीतील ग्रामीण भागात ६१% कूटूंबे तर शहरी भागातील ६४% कूटूंबे मालमजूरीवर उपजीविका चालवत आहेत. (थोरात) रोजंदारीवर उदरनिर्वाह करणाऱ्या आरक्षित जातीतील कुटूंबाचे प्रामण इतर समाजातील कुटूंबाच्या तुलनत चौपट आहे. (थोरात) व यात बेकारीचे प्रमाण सुध्दा दररोज वाढत आहे.

ग्रामीन भागातील दलितांची सामाजिक स्थिती पाहता त्यांच्या वस्त्या पंरपरागतच आहेत. त्यांच्या गल्लीत रस्ते नाल्या व्यवस्थीत नाहीत. गावातील इतर समाजातील लोक यांच्या वस्तीकडे घाणपाणी सोडणे व उंकडयात कचरा टाकणे. हे आजही चालू आहे. वाऱ्याने हा कचरा त्यांच्या घराकडे उडत येतो. हा प्रकार जवळपास प्रत्येक गावात आढळतों.अनुसूचित जातीच्या वस्तीमधील रस्ते व खुल्या प्रवर्गातील लोकांच्या प्रवर्गातील रस्ते हे पाहताक्षणीय त्यांच्यातला भेद आपणास स्पष्ट दिसून येतो. शहरापासून दुर असलेल्या गावात आजही सामाजिक संबंध हे जातीवरच आधारलेले आहेत. जातीय तिव्रता यामूळे ग्रामीण भागात कुठलाच व्यवसाय यांना करता येत नाही. एखादे गाव मोठे अथवा मुख्य रस्त्यावर असल्यास त्याठिकाणी अनुसुचित जातीच्या लोकांची पानटपरी, चपला शिवण्याचे दुकाने दिसून येतात.

संशोधनासाठी निवडलेल्या नांदेड, परभणी, लातूर, हिंगोली गावातील स्थिती जवळपास या अहवाला सारखीच आहे. दलितांनी आजही मंदीरात प्रवेश नाही. जर प्रवेश केल्यास मारहान करण्यात येते *(दलितांमधील कांही जातीचे लोक बाहेरूनच मंदीराचे दर्शन घेतात)* रावणंगाव (तामसा) या गावातील मंदीराचे बांधकाम अनुसूचित जातीतील कुटूंब करत आहे. सध्या बांधकाम सुरु असल्यामूळे ते मंदिरात जाऊ येवू शकतात पण मंदीर बांधकाम पुर्ण झाल्यानंतर यांना आत प्रवेश बंदी असणार आहे का हा सुध्दा संशोधनाचा विषय आहे. गावात दलितांना समानतेचा दर्जा देत नाहीत. लग्न समारंभास व इतर कार्यक्रमास यांना बोलावल्यास सर्वांचे जेवण झाल्यानंतरच बसविण्यात येते. जेवणानंतर जेवलेल्या पत्रावळया यांनाच उचलाव्या लागतात अथवा दलितांपैकी कुणी त्यांच्याकडे कामाला असल्यास तो उचलतो. खुल्या प्रवर्गांचे लोक उचलत नाहीत. ज्या गावात दलित आत्मसन्मानाने जगण्याचा प्रयत्न करतात त्यांना संपुर्ण गावाचा रोष पत्करावा लागत आहे. यामुळे समानतेने जगण्याच्या मांनवी हक्कावर गदा निर्माण होत आहे. अत्याचारास सारख्या घटना घडत आहेत.

**दलित अत्याचार**

दलित अत्याचारांच्या घटना या मराठवाडयात केवळ जातीय आधारामुळेच घडत आहेत. मराठवाडयात दलित अत्याचाराच्या घटनां मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या आदोलनाच्या काळात मोठया प्रमाणात घडलेल्या आहेत व आजही अनेक कारणांनी अत्याचारांच्या घटना घडतच आहेत. त्यात नायगाव तालूक्यातील एका तरुणाचे प्रेमप्रकरणातून दोन्ही डोळे फोडण्यात आले होते. कालांतराने या प्रकरणातील सर्वच आरोपी निर्दोष सुटले. गंगाखेड तालूक्यात फुकट झाडू का देत नाहीस म्हणून मारहान केल्यामूळे एका ६० वर्षीय व्यक्तीचा जागेवरच मृत्यू झाला होता. गावात जयंतीची मिरवणूक काढण्यास विरोध करणे, दलितांच्या शेतात जबरदस्ती जनावरे सोडणे,

अडवणूक केल्यास घाण शिव्यादेणे मारहाण करणे या गोष्टी सर्रास चालतात. आडगाव ता. लोहा या गावात दलितमहिला मृत्यू पावल्यानंतर तिच्या अंत्यविधीस स्माशान भूमी वरुन वाद निर्माण करण्यात आला होता.

या अत्याचाराच्या स्वरूपातून पाहता दलितांच्या मुलांची प्रगती, त्यांना मिळणारे आरक्षण, महापुरूषांच्या जयंती प्रस्तापितांना होणार विरोध या कारणातून अनेक वेळा दलितांना लक्ष करण्यात येत आहे. त्यामुळे त्यांना मिळणाऱ्या शासकिय सवलती पासून वंचित ठेवणे. त्यांच्या विकासाच्या मार्गात अडथळे निर्माण करणे. या अनेक कारणामुळे दलितांनवर अत्याचाराच्या घटना मोठया स्वरूपात घडत आहेत. संशोधनासाठी निवडलेल्या गावातील अत्याचाराच घडलेल्या घटनावरून पाहता त्यांच्या मानवी हक्काचे उल्लंघन कशा प्रकारे होत आहे. केवळ एका विशिष्ट जातीचे म्हणून त्यांना त्यांच्या अधिकारापासून वंचित ठेवण्यात येत आहे. आपण सतत जागतिक स्थरावर मानवअधिकार, मानवी मुल्ये, समानहक्क या बध्दल सतत मोठमोठयाने प्रश्न मांडत असतो पण देशात दररोज दलित आत्याचाराच्या घटना पाहता मानवी अधिकाराची मुल्ये केवळ नावालाच असल्याची दिसून येतात रुद्रवाडी ता. उदगीर या गावात झालेल्या आत्याचाराच्या विरोधात गुन्हा नोंदविला म्हणून त्या संपूर्ण जातीच्या लोकांवर खुल्याप्रवर्गातील लोकांनी बहिष्कार टाकला. मग या ठिकाणी प्रशासन सुध्दा पूर्णतहा फोल ठरले. मानीव हक्काची पुर्णपणे पायमल्ली झाली. दलित अत्याचाराच्या घटनेत, तडजोड न झाल्यास उलट स्वरुपाचे गुन्हे दाखल करणे, गावाचा संपूर्ण दलित समाजावर सामाजिक बहिष्किार टाकण्यात येतो हे वास्तव आहे. मग आपण जे बोलत असतो मानवी कृत्यांची जोपासना करणे, कायदयाचे पालन करणे, गंभीर घटना घडल्यानंतर सुध्दा आरोपी निर्दोष सुटतात, दलित अत्याचार कायद्या अंतर्गत गुन्हाची नोंद केल्यानंतरच दलितांवर उलटस्वरुपाचा दरोडा, चोरी, छेडछाड, चेच गुन्हे कसे दाखल होता याबध्दल ना देशातील मानवअधिकार आयोग चर्चा करते ना प्रशासन म्हणून मानवी अधिकार आयोगाच्या परिषदा भरवून हे प्रश्न सुटनारे नाहीत, व कायदे बनवून सुटनार नाहीत तर त्याची अमलबजावणी योग्य प्रमाणे झालीच पाहिजे हे महत्वाचे आहे तरच या मानवी हक्कांचे हित आहे.

**Source:**


1- नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर या जिल्हातून निवडलेल्या १०० गावातून घेतलेल्या प्रत्यक्ष मुलाखती?
2- भाटवडेकर मो.वि. **मराठी पर्यायी शब्दांचा कोश** साधना प्रकाशन, पुणे, २०००
3- Shinde Premkumar **"Dalits and Human Rights"** Isha Books, New Delhi, 2005
4- Thorat Sukhadeo, **"Dalit In India, Search for a common Destiny "**, sage publication New Delhi 2009
5- सारस्वत अक्षेन्द्र नाथ, **सामाजिक न्याय मानवाधिकार और पुलिस** राधा पब्लिकेशन्स, नई दिल्ली, २००२
6- रतू कृष्ण कुमार **भारतीय दलित और मानवाधिकार जातिवाद और संवैधानिक संरचना ,** बुक एनक्लेव जयपूर, २००२.
7- Michael. S.M. **'Dalit in modern India, vision and values'**, sage, publication , New Delhi 2007.
8- Shah Ghan shyam **Dalits Identity and politics** sage publication New Delhi 2001
9- नागरी हक्क संरक्षण विभाग, नांदेड परिक्षेत्र, (नांदेड, हिंगोली, लातूर, परभणी, भाग्यनगर पोलीस स्टेशन, नांदेड
10- Michael. S.M. 'Dalit in modern India, vision and values', sage, publication , New Delhi 2007.
11- Shah Ghanshyam Dalits Identity and politics sage publication New Delhi 2001
12- Ghanshyam Shah, Harsh Mander, SukhadeoThorat. Satish Deshpande, Amita Baviskar "Untouchability in Rural India."2006, Sage Publication Delhi.
13- National Crime record Bureau Govt of India 2001 to 2020.
14- Narwani.G.S.(2011), "Atrocities against scheduled castes and scheduled Tribes, Rawat publication

**15-** *"तुमचे हक्क जाणुण घ्या" राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.*

**16-** *"मानवी हक्काचे आंतराष्ट्रीय करारनामे" राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुबई.*

**17-** *सारस्वत अक्षेन्द्र नाथ, "सामाजिक न्याय मानवाधिकार और पुलिस", राधा पब्लिकेशन नई दिल्ली, 2002*

**18-** Antony. M.J. "Dalit Rights: landmard judgements on SC/ST Backward classes, New Delhi. India social Institute 1997.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com